N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अकोला **P.S.(ठाणे):** तेल्हारा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0370 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**14/07/2026 23:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिंनाक पासून):** 14/07/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 14/07/2026
**Time From (वेळेपासून):** 15:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 14/07/2026 **Time (वेळ):** 23:33 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 039
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 14/07/2026 23:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** घोडेगांव रोड, आरकेबारगार्डन अण्ड, रेस्टारंट तेल्हारा, ,तेल्हारा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पा◌े नी प्रविण जनार्दन वेरूळकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, अकोल,तेल्हारा,अकोला,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, अकोल,तेल्हारा,अकोला,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9765141925

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 श्री. संदीप विजय ◌ाडोकार | | | 1. पंचायत समिती, तेल्हारा , तेल्हारा,तेल्हारा,अकोला, महाराष्ट्र,भारत |
| 2 | शिरीष भिमराव सदापूरे | | | 1. पंचायत समिती, तेल्हारा, तेल्हारा,अकोला,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम सहा हजार रुपये | 6,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

6,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

नक्कल फियाद लाचलुचपत प्रतिंबधक विभाग,अकोला दिंनाक:- 14.07.2026 मी प्रविण जनार्दन वेरूळकर, वय 43 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, अकोला शासनातर्फे फियाद देतो की, दिंनाक 07.07.2026 रोजी ला.प्र.वि., अकोला कार्यालयात हजर असतांना तक्रारदार सौरभ सुधाकरराव पिंपळकर, वय 34 वर्ष, शिक्षण- बी.ई., धंदा- मे. सौरभ पिंपळकर सप्लायर्स, अमरावती, रा. गोपालनगर, अमरावती ता.जि. अमरावती हे लोकसेवकाविरूध्द तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, अकोला येथे समक्ष हजर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. सौरभ सुधाकरराव पिंपळकर यांना त्यांचे तक्रारी बाबत प्रथम सविस्तर विचारपूस केली. त्यांना त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून देण्यास सांगितले असता त्यांनी त्यांची तोंडी तक्रार नोंदवून घेण्याची विंनती केली.सदर तक्रारीवरुन पुढिल कार्यवाहीकरीता मा. सह जिल्हा निंबधक तथा जिल्हा मुद्रांक अधिकारी कार्यालय, अकोला यांना या कार्यालयाचे पत्र क्र. 1018/2026, दिंनाक 07.07.2026 अन्वये पत्र दिले. त्यावरून त्यांनी त्यांचे कार्यालयातील 1) श्री. अविनाष बापुराव महाले, पद- षिपाई 2) श्री. राहुल किसन खडसे, पद- कनिश्ठ लिपीक यांना पंच म्हणून लाप्रवि. अकोला कार्यालयात पाठविले. नमुद दोन्ही पंचांनी सदर कार्यवाहीत पंच म्हणून काम करण्याची संमती दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार यांचे तक्रारीबाबत त्यांना तोंडी विचारपूस करण्यास सांगीतले. त्यावरून दोन्ही पंचांनी तक्रारदारास विचारणा केली. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री. सौरभ सुधाकरराव पिंपळकर यांची तोंडी तक्रार कार्यालयीन लॅपटा◌ॅपवर टंकलिखीत करण्यात आली. सदर टंकलिखित तक्रारीची प्रिंट आऊट काढून त्या तक्रारीवर श्री. सौरभ सुधाकरराव पिंपळकर यांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. सौरभ सुधाकरराव पिंपळकर यांनी नोंदविलेली तक्रार व त्यांचेकडे तक्रारीसंबंधी तोंडी विचारपुस केलेला मजकुर सारखाच असल्याची आमची व दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर सदर तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. सौरभ सुधाकरराव पिंपळकर यांनी नोंदविलेल्या तक्रारीतील मजकुर खालीलप्रमाणे आहे.'' मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, अकोला येथे◌े समक्ष हजर येवून तक्रार नोंदवितो की, मी वर नमुद पत्यावर राहत असुन कंस्ट्रक्षनचे कामकाज करतो. सन 2023-24 मध्ये ग्रामपंचायत पिंवदळ खुर्द ता. तेल्हारा जि. अकोला येथील आर.सी. मातोश्री पांदण रस्ता श्री. तुशार तळोकार ते नांदखेड रोड पर्यंत हा रस्ता मा. गट विकास अधिकरी, पं.स. तेल्हारा जि. अकोला यांचेकडून मंजुर होवून ग्राम पंचायत कार्यालय, पिंवदळ खुर्द यांचेकडे आला होता. सदर पांदण रस्त्याचे काम ग्रामपंचायत पिंवदळ खुर्द यांनी पुर्ण केलेले आहे. सदर कामावर लागणारे साहीत्य मी माझे मे. सौरभ पिंपळकर सप्लायर्स मार्फत पुरवठा केलेला असुन सदर साहीत्याचे एकुण रू. 14,78,000/- चे देयक मी ग्रामपंचायत कार्यालयास सादर केलेले आहे. सदर पांदण रस्त्याचे कामकाजावर श्री. सदापुरे, कनिश्ठ अभियंता, पंचायत समिती, तेल्हारा यांनी देखरेख करून सदर कामाचे मोजमाप घेवून देयके सादर करण्याकरीता पंचायत समिती, तेल्हारा येथे सादर केलेले आहे.

सदर कामावर पुरवठा केलेल्या साहीत्याचे देयक मिळणे करीता मी ग्रामपंचायत कार्यालय, पिंवदळ खुर्द येथे जावून तेथील सचिव व सरपंच यांना वारंवार विचारणा केली परंतु सदर कामाचे देयक अद्याप पावेतो पंचायत समिती, तेल्हारा कडुन मंजुर झालेले नसल्याबाबत त्यं◌ानी मला वेळोवेळी सांगीतले. अंदाजे मार्च 2026 मध्ये मी ग्रामपंचायत कार्यालय, पिंवदळ खुर्द येथे जावून देयका संबंधी विचारणा केली असता, श्री. प्रशांत मेंघे, सरपंच यांनी मला सांगीतले की, तुम्ही श्री. सदापुरे, कनिश्ठ अभियंता व श्री. झाडोकार, एपीओ हे पांदण रस्त्याच्या कामाचे देयके सादर करण्याचे काम करीत असल्याने त्यांना पंचायत समिती, तेल्हारा येथे जावून बिंलासबंधी विचारणा करा.

त्यामुळे मी माहे मार्च 2026 मध्ये पंचायत समिती, तेल्हारा येथे जावून श्री. सदापुरे, कनिश्ठ अभियता व श्री. झाडोकार, एपीओ यांना आर.सी. मातोश्री पांदण रस्ता श्री. तुशार तळोकार ते नांदखेड रोड पर्यंत पांदण रस्ता या रस्त्यावर पुरवठा केलेल्या साहीत्याचे देयकासंबंधाने विचारणा केली असता, त्यांनी सदर कामाचे देयक काढण्यासाठी बिडीओ यांना द्यायचे आहे असे म्हणुन माझेकडे रू. 7,000/- ची मागणी केली. तसेच याव्यतिरीक्त सदरचे देयक काढून दिल्यानतर श्री. सदापुरे, कनिश्ठ अभियता व श्री. झाडोकार, एपीओ यांनी 14 लाखाचे एक-एक टक्याप्रमाणे रू. 14,000/- ची मागणी केली. त्यावर मी त्यांना देयक काढून द्या, त्यानंतर पैसे देईल असे नाईलाजास्तव बोलून तिथून निघून आलो. त्यानंतर मी श्री. सदापुरे, कनिश्ठ अभियता व श्री. झाडोकार, एपीओ यांना वेळोवेळी फोन करून सदर देयक काढून देण्याबाबत विंनती केली. परंतु त्यांनी आजपावेतो सदर कामाचे देयक काढून दिलेले नाही. श्री. सदापुरे, कनिश्ठ अभियता व श्री. झाडोकार, एपीओ दोन्ही पंचायत समिती, तेल्हारा जि. अकोला यांनी मी आर.सी. मातोश्री पांदण रस्ता श्री तुशार तळोकार ते नांदखेड रोड पर्यंत या पांदण रस्तावर पुरवठा केलेल्या साहीत्याचे देयक काढून देण्यास मदत करण्याकरीता बिडीओ यांना द्यायचे आहे असे म्हणुन माझेकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 7,000/- तसेच याव्यतिरीक्त 14 लाखाचे एक-एक टक्याप्रमाणे प्रत्येकी रू. 14,000/- त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी त्यांचेविरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. माझा त्यांचेशी कोणताही उसनवारीचा व्यवहार किंवा वैरभाव नाही. माझी तक्रार माझे सांगीतल्याप्रमाणे लॅपटाॅपवर टंकलिखीत केलेली असुन वाचुन पाहिली असता बरोबर व खरी आहे." तक्रारदार श्री. सौरभ सुधाकरराव पिंपळकर यांनी नोंदविलेल्या तक्रारी नुसार गैरअर्जदार श्री. सदापुरे, तांत्रीक सहायक व श्री. झाडोकार, सहायक कार्यक्रम अधिकारी दोन्ही पंचायत समिती, तेल्हारा जि. अकोला यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हाॅईस रेकार्डरव्दारे लाच मागणीची पडताळणी दिनाक 08.07.2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दिनाक 07.07.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर दिनाक 08.07.2026 चे 14.20 वा. ते 15.18 वा. दरम्यान गैरअर्जदार श्री. सदापुरे, तांत्रीक सहायक व श्री. झाडोकार, सहायक कार्यक्रम अधिकारी दोन्ही पंचायत समिती, तेल्हारा जि. अकोला यांची तक्रारदार श्री. सौरभ सुधाकरराव पिंपळकर यांच्याकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी गैरअर्जदार श्री. सदापूरे, तांत्रीक सहायक यांचे तेल्हारा ता. तेल्हारा जि. अकोला येथील भाड्याच्या रूमवर करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. सदापुरे हे घरी हजर मिळून आले नाही. त्यावेळी तिथे गैरअर्जदार श्री. झाडोकार, सहायक कार्यक्रम अधिकारी हे हजर होते. त्यावेळी त्यांचेषी कामासंबंधाने झालेल्या बोलणी दरम्यान गैरअर्जदार श्री. झाडोकार, सहायक कार्यक्रम अधिकारी यांनी बिडीओ साहेबाले पैसे द्या लागते' असे बोलून रू. 7000/- लाच रकमेची मागणी करून तडजोडीअंती रू. 6000/- लाच रकमेची मागणी केली. त्यानंतर थोड्या वेळानंतर गैरअर्जदार श्री. सदापुरे, तांत्रीक सहायक यांचा त्यांचे मोबाईल क्र. 8830534492 वरून तक्रारदाराचे मोबाईल क्र. 9595457909 वर फोन करून त्यांनी तक्रारदारास त्यांचे तेल्हारा येथील राहते घरी बोलाविले. त्यामुळे गैरअर्जदार श्री. सदापुरे, तांत्रीक सहायक यांची तक्रारदाराकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर दिनाक 08.07.2026 चे 16.28 वा. ते 17.28 वा. दरम्यान गैरअर्जदार श्री. सदापुरे, तांत्रीक सहायक व श्री. झाडोकार, सहायक कार्यक्रम अधिकारी दोन्ही पंचायत समिती, तेल्हारा जि. अकोला यांची तक्रारदार श्री. सौरभ सुधाकरराव पिंपळकर यांच्याकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी गैरअर्जदार श्री. सदापूरे, तांत्रीक सहायक यांचे तेल्हारा ता. तेल्हारा जि. अकोला येथील भाड्याच्या रूमवर करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. झाडोकार, सहायक कार्यक्रम अधिकारी यांनी बिडीओ यांना द्यायचे आहे असे म्हणुन तक्रारदाराकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 6000/- मध्ये तडजोड करून गैरअर्जदार श्री. सदापुरे, तांत्रीक सहायक यांनी रू. 5000/- 'देवून दे' असे बोलून लाच रकमेची मागणी करून ती लाच रक्कम श्री. झाडोकार यांना देण्याकरीता प्रोत्साहन दिले. तसेच सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री. झाडोकार, सहायक कार्यक्रम अधिकारी यांनी तक्रारदाराचे 14 लाखाच्या देयकाचे एक टक्का रू. 14,000/- लाच रकमेची मागणी करून सदरची रक्कम 'चार महीन्यानंतर दिले तरी चालेल' असे म्हटले. त्यावर तक्रारदाराने 'मी करून देतो...सहा हजार' असे म्हटले. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान बिडीओ, पंचायत समिती, तेल्हारा जि. अकोला यांचा उल्लेख झाल्याने श्री. अशाेक बांगर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तेल्हारा जि. अकोला यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे किंवा कसे? याबाबत दिनाक 09.07.2026 रोजी लाच मागणीची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. दिनाक 08.07.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 2 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर दिनाक 09.07.2026 रोजी श्री. अशाेक बांगर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तेल्हारा जि. अकोला यांच्याबाबत गोपनिय माहिती घेतली असता, ते पंचायत

समिती कार्यालयात हजर आले नसल्याचे तसेच श्री. अषोक बांगर, गट विकास अधिकारी यांचेकडे डेप्युटी सि.ई.ओ. पंचायत, जिल्हा परिशद, अकोला चा चार्ज असल्याने ते अकोला येथे असुन ते पंचायत समिती, तेल्हारा येथे येणार नाहीत. त्यामुळे श्री. अशा◌ेक बांगर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तेल्हारा जि. अकोला यांची लाच मागणी पडताळणी कार्यवाही जिल्हा परिशद, अकोला कार्यालयात दिंनाक 10.07.2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दिंनाक 09.07.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 3 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर दिंनाक 10.07.2026 चे 14.47 वा. ते 15.30 वा. दरम्यान श्री. अशा◌ेक बांगर, गट विकास अधिकारी यांची लाच मागणी पडताळणी जिल्हा परिशद, अकोला येथील त्यांचे कार्यालयात करण्यात आली. सदर पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार श्री. सौरभ पिंपळकर यांनी त्यांचे कामासंबंधी बोलणी केली असता श्री. अशा◌ेक बांगर, गट विकास अधिकारी यांनी कामासंबंधी माहिती देवून पुढची प्रोसेस करीता 'झाडोकार साहेबांसोबत संपर्कात रहा' असे बोलून कुठल्याही प्रकारची लाच रकमेची मागणी केली नाही. दिंनाक 10.07.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 4 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर आज दिंनाक 14.07.2026 चे 15.00 वा. ते 15.09 वा. दरम्यान आर.के. बार गार्डन अ◌ॅण्ड रेस्टा◌ॅरंट, घोडेगांव रोड, तेल्हारा, ता. तेल्हारा जि. अकोला येथे सापळा रचण्यात आला. सदर सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. संदीप विजय झाडोकार, पद- सहायक कार्यक्रम अधिकारी यांनी तक्रारदार श्री. सौरभ सुधाकरराव पिंपळकर यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 6,000/- तक्रारदाराकडून पंचासमक्ष स्विकारली. त्यानंतर गैरअर्जदार श्री. संदीप विजय झाडोकार यांना लाच रकमेसह ताब्यात घेवून त्यांचेकडुन लाच रक्कम रू. 6000/- दोन्ही पंचासमक्ष जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आली. दिंनाक 14.07.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 5 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत. करीता आरोपी क्र. 1) श्री. संदीप विजय झाडोकार, वय 42 वर्ष, पद- सहायक कार्यक्रम अधिकारी, पंचायत समिती, तेल्हारा जि. अकोला, मु. पो. पातुर्डा ता. संग्रामपूर जि. बुलढाणा ह.मु. तहसिल रोड, गाडेगांव, तेल्हारा ता. तेल्हारा जि. अकोला (इलोसे व आरोपी क्र. 2) श्री. शिरीश भिमराव सदापूरे, वय 54 वर्ष, पद- तांत्रीक सहायक, पंचायत समिती, तेल्हारा जि. अकोला (इलोसे) रा. शिवानी अपार्टमेंट, बर्डे ले-आऊट, फ्लॅट नंबर 203, अर्बुटल, एम्पायर जवळ, जयताळा, नागपूर ता.जि.नागपूर यांचे हे कृत्य कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा होत असल्याने माझी त्यांचे विरूध्द शासनातर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

santosh vishwanath ingle(I (Inspector)) / **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**
ठाणे अंमलदार पोलीस स्टेशन,तेल्हारा
**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** santosh vishwanath
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**